माहे ऑक्टोंबर,२०१९ चे माहे नोव्हेंबर,२०१९
देय होणारे वेतन/ निवृत्तीवेतन प्रदान
करणेबाबत....

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
अर्थ प्रशासन विभाग
पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)

जा.क्र.अप्रवि/ अंदाज/ 2043 /२०१९ दिनांक: १४/१०/२०१९

वाचा: १) शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.१५३/कोषा-प्रशा५,दिनांक ०९/१०/२०१९.
२) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.संलेको-२०१९/कोप/सलेअ-२ /दिवाळी वेतन/निवृत्तीवेतन/२०१९/२८४,दिनांक ११/१०/२०१९.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. अप्रवि/अंदाज/२००१/२०१९, दि.०९/१०/२०१९.

## परिपत्रक

दिवाळी सणाची सुरुवात यावर्षी दि.२५ ऑक्टोंबर,२०१९ पासून होत आहे त्यामुळे माहे ऑक्टोंबर,२०१९ चे माहे नोव्हेंबर,२०१९ देय होणारे वेतन/ निवृत्तीवेतन दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१९ पूर्वी प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे व त्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र.३ चे परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.

आता संदर्भ क्र. २ अन्वये निवडणूक कामासाठी कोषागारातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा मोठया प्रमाणावर निवडणूक कामासाठी आधीच अधिग्रहित करण्यात आलेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मनुष्यबळाच्या अभावी दि. २४/१०/२०१९ पूर्वी वेतन देयके/ निवृत्ती वेतन प्रदान कोषागार कार्यालयांना करणे शक्य होणार नसल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले दिनांक ९/१०/२०१९ चे शासन परिपत्रक शासनाने दिनांक ११/१०/२०१९ चे पत्रान्वये तूर्तास स्थगित केले आहे. त्यामुळे या कार्यालयाचे संदर्भ क्र.३ चे परिपत्रक तूर्तास स्थगित करण्यात येत आहे.

14/10/19
नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रत : १) सर्व विभागप्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी, डॉ.पं दे.कृ.वि., अकोला / नागपूर यांना योग्य कार्यवाहीस्तव.
२) मा.कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु महोदय यांचे माहितीस्तव.
३) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.
४) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला/ नागपूर यांना उचित कार्यवाहीस्तव.
५) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक

E:kakade sir nitin doc/ circular